# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक तात्काळ**

क्रमांक-रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१९/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ६ जानेवारी, २००७.

प्रति,
आयुक्त,
महानगरपालिका,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती, नागपूर

विषय:- राजकीय पक्षाद्वारे उभे करण्यात येणारे उमेदवार

राज्य निवडणूक आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, बऱ्याचदा महानगरपालिका निवडणुकांमध्ये एकाच पक्षाद्वारे एकाच प्रभागात एकापेक्षा अनेक उमेदवारांना पक्षातर्फे ए व बी फॉर्म देण्यात येतात. त्यावेळी असा संभ्रम निर्माण होतो की, कोणत्या उमेदवारास पक्षाचा उमेदवार म्हणून जाहीर करावा. त्याबाबत राज्य निवडणूक आयोग असे स्पष्टीकरण देत आहे की, ज्यावेळी पक्षाद्वारे एकापेक्षा जास्त उमेदवारांना ए व बी फॉर्म देण्यात येतात त्यावेळी जर त्या पक्षाने **उमेदवारी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी** दुपारी ३.०० वाजेपर्यंत नेमक्या कोणत्या उमेदवाराला उमेदवारी दयावयाची असे पत्र संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दिले असेल तर त्या उमेदवारांना त्या पक्षाची उमेदवारी देण्यात यावी. जर असे पत्र शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत दिले नसेल तर ज्या उमेदवाराने सर्वप्रथम उमेदवारी अर्ज दाखल केला असेल त्यालाच पक्षाचा अधिकृत उमेदवार मानण्यात यावे. ही बाब पर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या लक्षात आणून दयावी.

दिनांक- ५ जानेवारी, २००७ रोजी निर्गमित करण्यात आलेले पत्र अधोरेखित केलेल्या भागाऐवजी उमेदवारी अर्ज मार्ग घेण्याच्या शेवटच्या दिवशी असा झाला होता. त्यामुळे दिनांक- ५ जानेवारी, २००७ चे पत्र रद्द समजण्यात यावे.

( नन्द लाल )
आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग